बातमीपत्र
पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
माहिती कक्ष, दि ०३ सप्टेंबर २०२५

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४२०/२०२५ भा.न्या.संहिता कलम ११८(१),११५(२),३५२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/०८/२०२५ रोजी दुपारी १३.०० वा चे सुमारास, विजापूर नाका झोपडपट्टी नं.०२, गौड गल्ली, एकता मित्र मंडळ तरुण मंडळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०९/२०२५ रोजी १५.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोतीलाल श्रीपती ढोकरे, वय- ६६ वर्षे, रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं. २, चांदतारा मशिदीजवळ, मेमन किराणा दुकानच्या समोर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अजित तारासिंग साळुंखे, रा. दोन नंबर झोपडपट्टी, गौड गल्ली, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीताने फिर्यादी काम करत असलेल्या एकता तरुण मित्र मंडळ सोलापू या मंडळाचे मंडपाचे काम करीत असताना फिर्यादीच्या ओळखीचा वरील आरोपीत हा तेथे आला व त्याने फिर्यादी लावत असलेल्या मंडपाचे कापड बदलण्यास सांगितले. फिर्यादी त्याला सदर कापड मंडळाचे पदाधिकारी यांनी बसवण्यास सांगितले आहे. असे म्हणालेवरून त्याने कापड का बदलत नाही असे म्हणून शिवीगाळ करुन लाकडी बांबुने मारहाण करुन फिर्यादीचे डावे कानास दुखापत करुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- सफौ- शेख- ९५२९२७७६१७ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७५७/२०२५ भा.न्या.संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०२/०९/२०२५ रोजी २०.०० वा ते दि. ०३/०९/२०२५ रोजी सकाळी ०८.३० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०९/२०२५ रोजी १७.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मुबारक इब्राहिम आत्तार, वय- ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. १८०, सिध्देश्वर नगर भाग-२/३, नई जिंदगी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ५०,०००/- रु एक काळया रंगाची त्यावर सिल्व्हर रंगाचा पट्टा असलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी डी ०५३३ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोह- २७३ गायकवाड-७६५०२७३२७३ |

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६५१/२०२५ भा.न्या.संहिता कलम १०५,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०३/०९/२०२५ रोजी पहाटे ०४.१० वा चे सुमारास, छ. शिवाजी महाराज चौक, सोलापूर येथील छ. शिवाजी महाराज यांचे चबुतऱ्यावर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०३/०९/२०२५ रोजी १२.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | पोकॉ/ ३८८ अतुल लक्ष्मण रिकीबे, नेम- फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) सुरज सुरेश सुरवसे, रा. मराठा वस्ती, भवानी पेठ, सोलापूर , २) प्रशांत दत्तात्रय मरगणे, रा. अवंती नगर, सोलापूर |
| **मयताचे नाव** | **:** | एक अनोळखी इसम अंदाजे ४० वर्षे, |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील छ. शिवाजी महाराज चौक, सोलापूर येथील छ. शिवाजी महाराज यांचे चबुतऱ्यावर एक अनोळखी नग्न अवस्थेतील इसम अंदाजे वय- ४० वर्षे, हा चढल्याचे कारणावरुन त्यास खाली घेत असताना तो अंगावर गेल्याने सुरज सुरवसे याने लाकडाने मारहाण करुन खाली उतरवत असताना तो चबुतऱ्यावरुन खाली पडला त्यावेळी खाली उभारलेल्या प्रशांत मरगणे याने त्यास लाथाबुक्याने मारहाण केल्याने मयत झाला आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द सरकार तर्फे फिर्याद आहे. तपास:- सपोनि- खंडागळे- ९५६१९००१२२ |